4

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): सोलापुर ग्रामीण **P.S.**(ठाणे): सांगोला

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0146 **Year** (वर्ष): 2024

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 15/02/2024 23:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): दरमियानी दिन **Date From** (दिनांक पासून): 23/01/2024
**Time Period** (कालावधी): **Date To** ( दिनांक पर्यंत): 15/02/2024
**Time From** (वेळेपासून): 16:22 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 14:02 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 15/02/2024 **Time** (वेळ): 23:31 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
**Entry No.** (नोंद क्र.): 036
**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 15/02/2024 23:32 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
दक्षिण, 15 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): आलेगाव,-तासांगोला,सांगोला,

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अजित अर्जुन पाटील

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आलेगाव, तासांगोला, ,सांगोला, ,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आलेगाव, तासांगोला, ,सांगोला, ,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9921788575

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पांडुरंग रामचंद्र दिवसे | | | 1. आलेगाव, ता सांगोला, , सांगोला, ,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सौ.नंदाबाई पांडुरंग दिवसे | | | 1. आलेगाव, ता सांगोला, , सांगोला, ,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 10,000/ रू. लाचेची मागणी करून ती स्वीकारली. | 10,000.00 |
| 2 | इतर | घरगुती वस्तु | आरोपीच्या अंगावरील शर्ट | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**
10,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिर्यादी जबाब दि. 15.02.2024

मी अजित अर्जुन पाटील, वय-33 वर्षे, व्यवसाय-कॉन्ट्रॅक्टर, रा.आलेगाव, ता.सांगोला, जि.सोलापूर मो.नं. 9921788575 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,
मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहण्यास असुन शेती व्यवसाय व ग्रामपंचायतीकडून करण्यात येणाऱ्या विविध विकासकामांचे कंत्राटी घेऊन माझ्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवतो. दि.06/04/2022 रोजी आलेगाव ग्रामपंचायत कार्यालयाकडून गावातील बाबरवाडी येथील हनुमान मंदिरासमोरील सभामंडप बांधण्याचे काम मला मिळाले होते. त्यानुसार मी सभामंडपाचे बांधकाम पुर्ण केले आहे. सदर बांधकामाचे बिल 4,24,463/- रु. असून बिलाचे चेक देण्यासाठी मला गावचे सरपंच सौ. नंदाबाई दिवसे व त्यांचे पती पांडूरंग दिवसे हे माझ्याकडे बिलाचे 2 टक्के प्रमाणे 8000/- रुपये लाचेची मागणी करत असल्याने मी दि.17/01/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर येथील पोलीस उपअधीक्षक श्री. कुंभार यांना फोन करून माझी तक्रार सांगितली. पोलीस उपअधीक्षक श्री कुंभार यांनी माझ्या तक्रारीवर कारवाई करण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील पोलीस निरीक्षक चंद्रकांत कोळी यांना माझा मोबाईल क्रमांक देऊन आलेगाव येथे पाठवतो असे सांगितले. त्यानंतर पोनि कोळी यांनी मला संपर्क साधून मौजे आलेगावच्या अलीकडे सुमारे 02.00 किमी अंतरावर येऊन थांबण्यास सांगितले. त्यानंतर सुमारे 12.00 वा चे सुमारास पोनि कोळी हे शासकीय वाहनातून त्यांचा स्टाफ, एक महिला व एक पुरूष शासकीय पंच येऊन माझी भेट घेतली. गोपनीय कामासाठी निर्जन जागेची आवश्यकता असल्याने मी पोनि कोळी यांना माझ्या शेतामध्ये जाऊन पुढील सर्व कामकाज करू अशी विनंती केली, त्यानंतर आम्ही माझ्या शेतामध्ये जाऊन थांबलो. त्याठिकाणी पोनि कोळी यांनी मला शासकीय वाहनात बोलावून घेऊन दोन्ही पंचांची व माझी आपसात ओळख करून दिली. त्यावेळी मी दोन्ही पंचासमक्ष माझी वरील तक्रार कथन करून लेखी तक्रार दिली. सदरची लेखी तक्रार वाचून पोनि कोळी व पंचानी त्यावर सह्या केल्या.
त्यानंतर पोनि कोळी यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डरमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर सरपंच सौ.नंदाबाई दिवसे व त्यांचे पती श्री पांडूरंग दिवसे यांची पडताळणी करण्याचे अनुषंगाने मला तसेच पंच क्र.01 यांना योग्य त्या सुचना दिल्या आणि व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकावून माझ्याकडील मोटार सायकलवरून सरपंच सौ. नंदाबाई दिवसे यांचे घराकडे रवाना केले. मी व पंच नं.1 मिळून सरपंच सौ.नंदाबाई दिवसे यांचे घरी जाऊन त्यांची भेट घेतली, त्यावेळी श्री पांडूरंग दिवसे घरी नव्हते. सदरवेळी मी सरपंच सौ.नंदाबाई दिवसे यांचेशी चर्चा करून सभामंडप बांधकामाच्या बिलाचे चेकचा विषय काढला असता त्यांनी सभामंडपाचे कलरचे काम राहिले आहे की, ते पुर्ण करा असे सांगितले. त्यावेळी सरपंच नंदाबाई दिवसे यांचे पती पांडूरंग दिवसे हे घरी नसल्याने त्यांची व माझी भेट झाली नाही. त्यामुळे मी व पंच नं.1 त्यांचे घरातून परत येऊन पोनि कोळी यांची भेट घेऊन सदर बाबत हकीकत सांगितली. सरपंच यांचे पती पांडूरंग दिवसे हे त्यादिवशी उशिरापर्यंत घरी येण्याची शक्यता नसल्याने पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.
दि.23/01/2024 रोजी सरपंच यांचे पती श्री पांडूरंग दिवसे यांनी मला चेकसाठी बोलावले असल्याने मी पोनि

कोळी यांना फोन करून सदरबाबत कल्पना दिली. त्यावेळेस पोनि कोळी यांनी मला पडताळणी कारवाई करण्यासाठी पंचांना घेऊन येतो शेतामध्ये थांबून राहण्यास सांगितले. दुपारच्या सुमारास पोनि कोळी, दोन शासकीय पंच व स्टाफ असे येऊन माझी भेट घेतली. सदरवेळी यापुर्वी असलेले दोन्ही पंच इतर कामकाजामध्ये व्यस्त असल्याने त्यांच्याऐवजी इतर एक महिला व एक पुरूष पंच उपलब्ध झाल्याचे पोनि कोळी यांनी सांगितले. सदर दोन्ही पंचासमक्ष मी पुन्हा माझी तक्रार सांगितली. त्यानंतर सरपंच नंदाबाई दिवसे व त्यांचे पती पांडूरंग दिवसे यांच्यावर पडताळणी करण्याचे अनुषंगाने पोनि कोळी यांनी माझ्या गळ्यात व्हॉईसरेकॉर्डर अडकावून पंच नं.1 यांचेसह मला सरपंच दिवसे यांचे घरी रवाना केले. मी व पंच नं.1 दोघे सरपंच यांचे घरी जाऊन भेट घेतली. त्यावेळी सरपंच नंदाबाई दिवसे व त्यांचे पती पांडूरंग दिवसे दोघे ही घरामध्ये होते. मी पांडूरंग दिवसे यांच्याशी चर्चा करत असताना त्यांना माझ्या बिलाबाबत विचारणा केली असता त्यांनी माझ्याकडे सभामंडप बांधकामाच्या बिलाचेपोटी 8000/- रू. व मागील एका कामाच्या बिलाचे मोबदला म्हणून त्याचे 2000/- रू. असे एकूण 10,000/- रू. लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना ग्रामपंचायत कार्यालयातून चेक घेऊन येतो असे सांगुन पंच नं.1 यांचेसह पोनि कोळी यांची भेट घेण्याकरीता निघालो. मी व पंच माघारी येत असताना मला सरपंच यांचे पती पांडूरंग दिवसे यांचा फोन आला, त्यावेळी ते बाहेर जाणार असल्याने मला लवकर येण्यास सांगितले. त्यानंतर मी शेतामध्ये जाऊन पोनि कोळी याची भेट घेतली. पोनि कोळी यांनी मला व पंच नं.1 यांना घडलेली हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन खात्री केली. सदर रेकॉर्डींगमध्ये पडताळणीवेळी श्री पांडूरंग दिवसे यांनी माझ्याकडे बिलाचे मोबदल्यात 10,000/- रू. लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले परंतू सरपंच सौ. नंदाबाई दिवसे यांचेशी चर्चा झालेली नसल्याने व त्यांनी लाचेची मागणी केलेली नसल्याने लाच मागणीमध्ये त्यांचा सहभाग आहे अगर कसे याची स्पष्टता होण्यासाठी पोनि कोळी यांनी मला ग्रामपंचायत कार्यालयातून चेक घेऊन सरपंच यांच्या घरी जाऊन त्यावर सरपंचांची सही घेताना ते लाचेची मागणी करतात अगर कसे याबाबत पडताळणी करू असे सांगुन पुन्हा पंच नं.1 यांचेसह गळ्यात व्हॉईसरेकॉर्डर अडकावून रवाना केले. मी ग्रामपंचायत कार्यालयातील शिपाईकडून चेक घेऊन सरपंच सौ.नंदाबाई दिवसे यांचे घरी गेलो. सरपंच चेकवर सही करताना त्यांचे पती पांडूरंग दिवसे यांनी तुमच्या सवडीने द्या असे मी काय धरून ठेवलय का असे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं.1 असे दोघे पुन्हा माघारी येऊन पोनि कोळी यांची भेट घेतली. पोनि कोळी यांनी मला व पंच नं.1 यांना घडलेली हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकले. त्यानंतर पांडूरंग दिवसे व सरपंच नंदाबाई दिवसे मला भेटण्यास बोलावतील त्यावेळी पुढील कारवाई करण्याबाबत मी पोनि कोळी यांना विनंती केली. त्यामुळे पोनि कोळी यांनी सदरची कारवाई तुर्त स्थगित केली.

त्यानंतर दि.29/01/2024 रोजी मी पोनि कोळी यांना फोन करून सरपंच नंदाबाई दिवसे व त्यांचे पती पांडूरंग दिवसे यांची ग्रामपंचायत कार्यालयात भेट होऊ शकते, त्यामुळे पुढील कारवाईकरीता आलेगाव येथे येण्याची विनंती केली. त्यानुसार पोनि कोळी, त्यांचा स्टाफ व दोन्ही शासकीय पंच माझ्या शेतामध्ये येऊन माझी भेट घेतली. त्यावेळी पोनि कोळी यांनी श्री पांडूरंग दिवसे यांचेविरूध्द सापळा कारवाई करण्याचे ठरविले. त्यावेळी मी माझ्या बचतीमधील 500/- रू दराचे 20 नोटा याप्रमाणे 10,000/- रू रक्कम पोनि कोळी यांच्यासमक्ष हजर केले. पोनि कोळी यांनी सदर नोटांचे क्रमांक एका कागदावर लिहून घेतले व त्यावर अॅन्थ्रासीन पावडर लावून नोटा माझ्या शर्टाच्या खिशात ठेवले. त्यानंतर पोनि कोळी यांनी मला सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक सुचना देऊन पंच नं.1 यांचेसह माझ्या मोटार सायकलवरून आलेगाव ग्रामपंचायत कार्यालयाकडे रवाना करून आमच्या पाठीमागे येऊन ग्रामपंचायत परिसरात सापळा लावून थांबले परंतू तेथे सरपंच सौ.नंदाबाई दिवसे व त्यांचे पती उपस्थित नसल्याने मी व पंच शेताकडे परत गेलो. आमच्या पाठोपाठ सापळा पथक आले, त्यावेळी मी सरपंच व त्यांचे पती नसल्याने परत आल्याचे सांगितले.

त्यानंतर सदर दिवशी बराचवेळ वाट पाहून देखील सरपंच ग्रामपंचायत कार्यालयात न आल्याने पोनि कोळी यांनी सरपंच सौ.नंदाबाई दिवसे यांच्या घरी जाऊन सापळा करण्याचे ठरवून व्हॉईसरेकार्डर माझ्या गळ्यात अडकावून पंचासह सरपंचाच्या घरी रवाना केले. त्यावेळी पोनि कोळी व सापळा पथक शासकीय वाहनातून आमच्या पाठीमागे येऊन जवळा रोड वरील सरपंच यांच्या घरापासून थोड्या अंतरावर सापळा लावून थांबले. त्यानंतर मी व पंच दोघे सौ.नंदाबाई दिवसे यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली, त्यावेळी त्यांनी त्यांचे पती श्री पांडूरंग दिवसे हे घरी नसल्याबाबत मला सांगितले. त्यामुळे मी त्यांना त्यांचे पती पांडूरंग दिवसे यांनी माझ्याकडे मागणी केलेले 10,000 /- रक्कम तुमच्याकडे देऊ का असे विचारले असता त्यांनी मला माझ्याकडे नाही.. बघा तुमच्या तुम्ही असे म्हणून लाचेची रक्कम स्वीकारली नाही. त्यामुळे मी व पंच दोघे माझ्या शेताकडे परत निघालो. सदरवेळी पोनि कोळी व सापळा पथक माझ्यामागे शेताकडे येऊन माझी भेट घेतली व सरपंच यांचे घरी गेल्यानंतर काय घडले याबाबत मला व पंचास विचारले असता आम्ही वरील हकिकत सांगितली. त्यानंतर पोनि कोळी यांनी व्हॉईसरेकॉर्डरमधील रेकॉर्डींग

ऐकून खात्री केली.
सरपंच सौ. नंदाबाई दिवसे यांनी सापळा कारवाईवेळी बघा तुमच्या तुम्ही असे सांगुन लाचेची रक्कम त्यांचे पती पांडूरंग दिवसे यांच्याकडे देण्यास सांगितल्याने त्यांच्या विरूध्द सापळा कारवाई करण्याचे ठरवले. मी माझ्या ओळखीच्या लोकांकडून पांडूरंग दिवसे यांच्याबाबत माहिती घेतली असता ते गावातील सिध्दनाथ मंदिराजवळील आर.के किराणा दुकानाजवळ असल्याचे माहिती मिळाली. तेव्हा पोनि कोळी यांच्या सुचनेवरून मी व पंच आर.के किराणा दुकानाजवळ आलो. आमच्यापाठीमागे पोनि कोळी व सापळा पथक येऊन सापळा लावला. त्यावेळी मी श्री पांडूरंग दिवसे यांना इशारा केला असता, त्याठिकाणी बरेच लोक असल्याने श्री पांडूरंग दिवसे यांनी मला नंतर फोन करतो असे हाताने इशारा करून परत जाण्यास सांगितले. त्यामुळे मी तेथून परत गेलो. माझ्या पाठीमागे पोनि कोळी व सापळा पथक शेतामध्ये येऊन माझी भेट घेतली व मला तसेच पंचास घडलेली हकिकत विचारली असता, आम्ही वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर श्री पांडूरंग दिवसे फोन करतील तेव्हा पुढील कारवाई करू असे ठरले. त्यानंतर श्री पांडूरंग दिवसे यांचे नातेवाईक आजारी असल्याने ते गावात नसल्याने त्यांची व माझी भेट होऊ शकली नाही.
आज दि.15/02/2024 रोजी ग्रामपंचायत कार्यालयात मिटींग असल्याने आणि सरपंच व त्यांचे पती मिटिंगकरीता येणार असल्याचे माहिती मिळाल्याने मी पोनि कोळी यांना सदरबाबत माहिती दिली. पोनि कोळी यांनी पुढील कारवाई करण्याकरीता आलेगावला येणार असल्याची माहिती देऊन मला शेतामध्ये थांबण्यास सांगितले. दुपारी 12.00 वा चे सुमारास पोनि कोळी व सापळा पथक माझ्या शेतामध्ये येऊन माझी भेट घेतली. त्यानंतर सापळा कारवाई करण्याचे अनुषंगाने सर्व आवश्यक त्या सुचना देऊन माझ्या गळ्यात व्हॉईस रेकॉर्डर अडकावून मला पंचासह ग्रामपंचायत कार्यालयाकडे रवाना केले. माझ्या पाठीमागे पोनि कोळी व सापळा पथक ग्रामपंचायत कार्यालयासमोरील सिध्दनाथ मंदिर येथे येऊन ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरात सापळा लावून थांबले. मी व पंच असे दोघे ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन पाहिले असता, त्याठिकाणी सरपंच सौ.नंदाबाई दिवसे ह्या उपस्थित होत्या. त्यावेळी मी आजुबाजूस पाहिले असता त्यांचे पती पांडूरंग दिवसे हे आसपास दिसून आले नाही. त्यामुळे मी त्यांच्याकडे जाऊन त्यांचे पती श्री पांडूरंग दिवसे यांनी माझ्याकडे मागणी केलेले 10,000/- रू. द्यायचे आहेत, ते काकांकडे देऊ का असे विचारले असता त्यांनी त्यास होकार दिला. त्यामुळे मी व पंच बाहेर येऊन पाहिले असता श्री पांडूरंग दिवसे हे आसपास दिसून न आल्याने मी परत माझ्या शेताकडे गेलो. माझी पाठीमागे पोनि कोळी व सापळा पथक येऊन ग्रामपंचायत कार्यालयात गेल्यानंतर घडलेली हकिकत विचारून घेतली. त्यावेळी पोनि कोळी यांनी व्हॉईसरेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले रेकॉर्डिंग ऐकले. त्यामध्ये सरपंच सौ.नंदाबाई दिवसे यांनी लाच रक्कम त्यांचे पतीकडे देण्यास संमती दिल्याचे स्पष्ट झाले. काहीवेळाने सरपंच यांचे पती श्री पांडूरंग दिवसे हे ग्रामपंचायत का कार्यालयाजवळ आले असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोनि कोळी यांनी पुन्हा मला सापळा कारवाई करीता पंचासह रवाना केले व ते देखील सापळा पथकासह ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरात येऊन सापळा लावून थांबले. त्यावेळी मी व पंच दोघे ग्रामपंचायत कार्यालयाच्या बाहेर उभे असलेले श्री पांडूरंग दिवसे यांच्याकडे जाऊन चर्चा करू लागलो, त्यावेळी लाचेचा विषय निघाल्यावर श्री पांडूरंग दिवसे यांनी रक्कम बंडूकडे देण्यास सांगून निघून गेले. त्यामुळे मी व पंच दोघे पुन्हा माझ्या शेताकडे गेलो. आमच्या पाठीमागे पोनि कोळी व सापळा पथक शेतामध्ये येऊन पांडूरंग दिवसे यांची भेट घेऊन चर्चा करीत असताना काय घडले याची हकिकत विचारले असता आम्ही वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यावेळी पोनि कोळी यांनी बंडू कोण आहेत याबाबत मला विचारले असता ते माझे तसेच पांडूरंग दिवसे यांचेही मित्र असल्याचे सांगितले परंतु सदर कारवाईमध्ये बंडू यांचा काही संबंध नसल्याने मी त्यांच्याकडे लाचेची रक्कम देणार नाही असे पोनि कोळी यांना सांगितले. त्यावेळी पोनि कोळी यांनी मला पुन्हा सापळा कारवाई करीता पाठवून पांडूरंग दिवसे यांची भेट घेऊन बंडू हे सांगोला येथे गेले असल्याने त्यांची भेट होऊ शकणार नाही असे सांगून चर्चा करण्यास सांगितले. त्यावेळी पांडूरंग दिवसे यांनी लाचेची मागणी केल्यास लाच रक्कम द्यावे असे सांगितले. त्याप्रमाणे पोनि कोळी यांनी मला व पंचास पुन्हा सापळा कारवाईच्या अनुषंगाने ग्रामपंचायत कार्यालयाकडे रवाना केले. आमच्या पाठीमागे पोनि कोळी व सापळा पथक येऊन परिसरात सापळा लावून थांबले. मी ग्रामपंचायत कार्यालयाजवळ असताना श्री पांडूरंग दिवसे व सरपंच सौ.नंदाबाई दिवसे हे मोटार सायकलवरून जाताना दिसले. त्यावेळी मी त्यांना थांबवून त्यांचेशी चर्चा करत असताना श्री पांडूरंग दिवसे यांनी हाताच्या इशाऱ्याने माझ्याकडे लाचेची मागणी केली, तेव्हा मी त्यांच्याकडे लाचेची रक्कम दिली असता, त्यांनी ते घेऊन त्यांच्या शर्टाच्या खिशामध्ये ठेवले. त्यानंतर मी केलेल्या नियोजीत इशाऱ्यावरून पोनि कोळी व सापळा पथकातील कर्मचारी यांनी सदर ठिकाणी येवून श्री पांडूरंग दिवसे यांना ताब्यात घेतले. त्यावेळी पोनि कोळी यांच्या इशाऱ्यावरून महिला पंच यांनी सरपंच सौ.नंदाबाई दिवसे यांना ताब्यात घेतले. त्यावेळी पोनि कोळी यांनी सरपंच व त्यांचे पती यांना त्यांचे ओळख सांगुन त्यांचे नाव विचारून घेतले. सदर ठिकाणी शासकीय वाहनात लाचेच्या

सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही सांगोला येथील हॉटेल फाईव्ह स्टार येथील एका रूममध्ये पुर्ण करण्यात आले.
तरी दि.23/01/2024 रोजी 16.22 ते 17.23 व दि.15/09/2024 रोजी 12.34 ते 14.02 वा. चे दरम्यान सरपंच यांचे राहते घरी व आलेगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोरील मोकळ्या जागेत यातील आरोपी क्र.1) पांडुरंग रामचंद्र दिवसे, वय- 51 वर्षे, व्यवसाय- शेती, रा. आलेगाव, ता: सांगोला, जि. सोलापूर, व इलोसे सौ. नंदाबाई पांडुरंग दिवसे, पद-महिला सरपंच, मौजे आलेगाव ग्रामपंचायत, ता. सांगोला, जि. सोलापूर यांनी मी केलेल्या मौजे आलेगाव मधील बाबरवाडी येथील हनुमान मंदिराच्यासमोरील संभामंडपाचे कामाचे बिलाच्या मोबदल्यात 8000/- रु. व यापुर्वी केलेल्या कामाचे राहिलेला मोबदला 2000/- रु. असे एकूण 10,000/- रु. लाचेची मागणी करून ती लाच रक्कम महिला सरपंच सौ.नंदाबाई दिवसे यांनी त्यांचे पती पांडुरंग दिवसे यांच्याकडे देण्यास संमती दिली. त्यावरुन सदरची लाच रक्कम श्री.पांडुरंग दिवसे यांनी स्वत: स्वीकारून सांपतिक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे तसेच महिला सरपंच सौ.नंदाबाई दिवसे यांनी लोकसेवा प्रदान करण्यासाठी पतीच्या मार्फतीने अयोग्यरित्या बेकायदेशीर पारितोषण स्विकारुन गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केले आहे म्हणून त्यांचेविरूध्द फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

(चंद्रकांत कोळी)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Anant Mahipatrao Kulkarni(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदारांला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

A.APatil

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** ठाणे अंमलदार
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी) सांगोला पोलीस ठाणे

**Name** (नाव): Anant Mahipatrao Kı
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):